## नियमित दिवाणी दावा क्र. ११३/२०२५

## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय.०९–००००३७४–२०२५

## निशाणी क्र. ४१ वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४१ नियम (५)२ व नियम ५(३) अन्वये status quo आदेश मिळणेकरिता दाखल केला आहे.

०२. वादीचे कथन असे की, वादीने प्रतिवादीं विरुद्ध निरंतर ताकीदीचे दादीकरीता सदरचा दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी वादीने निशाण ५ येथे प्रतिवादीं विरुद्ध दाखल केलेला तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज मे. न्यायालयाने फेटाळला आहे. सदर नि.५ चे अर्जावरील केलेला आदेश वादीस मे. जिल्हा न्यायालयात अपिल दाखल करून आव्हानीत करावयाचे आहे. सदर अपिलाचे कामी वादीस यश येण्याची पूर्ण खात्री आहे. परंतु सदरचे अपिल दाखल करणेस काही कालावधी लागणारा आहे. या कालावधीत प्रतिवादींनी दावा मिळकतीवर बांधकाम केलेस वादीचे नुकसान होणारे असून वादीचे अपिल देखील निरर्थक ठरणारे आहे व पर्यायाने वादीस न्यायापासून वंचित रहावे लागणारे आहे. सबब, अपिल दाखल करणेस वादीस कायद्याने दिलेल्या मुदतीत वादी प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील परिस्थितीत कोणताही बदल करू नये असा Status Quo चा आदेश वादी–प्रतिवादींस करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.४२ येथे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी असे कथन केले आहे की, सदर कामी निशाण ५ येथील वादीचा अर्ज नामंजूर केला आहे. सदर आदेश योग्य व बरोबर आहे. सबब, सदर कामी status quo (जैसे थे) आदेश करणेची आवश्यकता नाही. वादीने सदर केलेली मागणी कायद्यातील तरतूदींशी विसंगत असल्याने ती कायदेशीर नाही.

अशाप्रकारे निशाण ५ चा अर्ज नामंजूर झाल्यानंतर त्याविरुध्द अपील दाखल करेपर्यंत दरम्यानचे काळात जैसे थे अथवा अन्य कोणताही आदेश मे. न्यायालयामार्फत पारीत करण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. वादीचा सदरचा अर्ज मंजूर केल्यास निशाण ५ चे अर्जावर गुणावगुणावर केलेला आदेश निरर्थक ठरेल. वादीने दाखल केलेला प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्याने वादीचे कोणतेही नुकसान होणारे नाही. उलट वादीचा सदर अर्ज मंजूर झाल्यास निशाण ५ चे अर्जावर गुणवत्तेवर सदर प्रतिवादीचे बाजूने आदेश होऊन देखील सदर प्रतिवादीवर ते अन्यायकारक होणारे आहे. त्यामुळे सदर प्रतिवादीचे अपरिमित नुकसान देखील होणार आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येऊ नये.

०४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत दावा हा वादी यांनी निरंतर व आज्ञार्थी ताकीद याकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी वादी यांनी तुर्तातुर्त मनाई करिता दाखल केलेला अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन दावा मिळकती मधील परिस्थीती मध्ये अपील कालावधी पुर्ण होईपर्यंत वादी व प्रतिवादी यांनी कोणताही बदल करु नये अशी मागणी केली आहे. प्रतिवादी यांच्या कथना नुसार असा आदेश करण्याची आवश्यकता नाही. वादी यांच्या दाव्यातील कथनांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुत दावा हा प्रतिवादी यांनी दावा मिळकती मध्ये बांधकाम करु नये या करिता मनाई हुकूम आदेश मिळावा या करिता दाखल केला आहे. जरी प्रस्तुत प्रकरणातील तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला अर्ज नामंजूर केला असला तरी वादी यांना निश्चीतच प्रस्तुत आदेशा विरोधात वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याची संधी दिली गेली पाहिजे. जर प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास दावा मिळकतीच्या स्वरुपामध्ये बदल होऊन वादी हे दाखल करणार असलेले अपील निष्फळ होण्याची शक्यता आहे. याउलट प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे सद्य स्थितीत कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वरील

सर्व परिस्थीतीचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

– **आदेश** –

वादी व प्रतिवादी यांनी आज पासून पुढील ३० दिवस म्हणजेच दि.२१/१०/२०२५ पर्यंत दावा मिळकती मध्ये जैसे थे परिस्थीती ठेवणेची आहे.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.09.20 18:01:05 +0530

( श्रीकांत एस.पचंडी )
दिनांकः २०/०९/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड